# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२६

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### अल्पसंख्यांक संस्थेतील अतिरिक्त शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेणेबाबत

**(१) ६१५ (२४-०४-२०२५) श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी, सेवाशर्ती, नियमावली १९८१ मधील तरतुदी अल्पसंख्यांक संस्थांना लागू असून अल्पसंख्यांक संस्थेतील अतिरिक्त शिक्षकांना अथवा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियम २६ व २७ नुसार सेवेत सामावून घेतले जात नसल्याचे माहे, जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,अल्पसंख्यांक संस्थेतील अतिरिक्त शिक्षकांना दिनांक १३ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयान्वये सेवेत सामावून घेण्याची स्वतंत्र कार्यपध्दती विहित करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अल्पसंख्यांक संस्थेतील शिक्षकांना सेवेत सामावून न घेतल्यामुळे संस्थेतील शिक्षकांची होत असलेली गैरसोय आणि त्यांना लागू केलेले no work no pay हे अन्यायकारक धोरण रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०४-२०२६) :** (१) व (२) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक २९/११/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सन २०२४-२५ च्या समायोजन प्रक्रियेस स्थगिती देण्यात आल्याने, सद्य:स्थितीत सन २०२५-२६ च्या संचमान्यता अंतिम झालेनंतर अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्याचे नियोजित आहे. शासन निर्णय दिनांक १३ जुलै, २०१६ अन्वये अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थामधील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीबाबत / वैयक्तिक मान्यता / समायोजनाबाबत कार्यपध्दती निर्गमित करण्यात आली आहे.

(३) शासन निर्णय दिनांक ३० जानेवारी, २०२६ नुसार शासन निर्णय दिनांक १३ जुलै, २०१६ मधील “विनाकाम विनावेतन (No Work No Pay)” ऐवजी अल्पसंख्याक संस्थांमधील अतिरिक्त ठरलेल्या

कर्मचाऱ्यांचे समायोजन करताना समायोजनाबाबतच्या दिनांक १५ मार्च, २०२४ मधील तरतुदीनुसार अथवा प्रचलित शासन धोरणानुसार कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात सोयाबीनचे भाव वाढलेले असतानाही आफ्रिकन देशातून सोयाबीनची आयात केली जात असल्याबाबत

**(२) ९७९ (०९-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सोयाबीनचे दर वाढले असूनही आफ्रिकन देशांमधून सोयाबीनची आयात केली जात असून शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात केंद्र शासनाशी विचारविनिमय करून सदर आयात निर्यात धोरणाचा फेरविचार करून सोयाबीनची आयात रोखण्यासंदर्भात व शेतकऱ्यांना न्याय मिळण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल (२०-०५-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.
राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये सोयाबीनचे माहे मे, २०२४ ते जून, २०२५ या कालावधीत सरासरी दर रुपये ४०२१.०० प्रति क्विंटल प्रमाणे होते. सदर कालावधीतील सोयाबीनचा सरासरी बाजारभाव वाढलेले दिसून येत नाही.
आयात निर्यात धोरण ठरविण्यासंदर्भातील धोरणात्मक निर्णय घेणे ही बाब केंद्र शासनाशी निगडीत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सूतगिरणी संचालकांची तसेच प्रवर्तकांची जात पडताळणी करून मान्यता प्रदान करण्याबाबत

**(३) १८८० (२४-०४-२०२५) श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या संस्थांना १०:४०:५० या तत्वावर सूतगिरणी दिली जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या संस्थांना १०:४०:५० या तत्वावर आतापर्यंत किती सूतगिरण्यांना परवानगी दिली आहे त्यापैकी किती सूतगिरण्या सुरू झाल्या आहेत तसेच किती सूतगिरण्या सुरू होण्याच्या प्रतिक्षेत आहेत. ज्या सूतगिरण्या सुरू झाल्या नाहीत त्या सुरू न होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास,अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या मागासवर्गीय सूतगिरणीच्या प्रत्येक सदस्यांना मा.न्यायालयाने जात पडताळणी प्रमाणपत्र मागितले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेकडो सदस्यांची जात पडताळणी होणे शक्य आहे काय, तसेच या धोरणात बदल करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे काय,
(५) अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या मागासवर्गीय सूतगिरणी संचालकांची तसेच प्रवर्तकांची जात पडताळणी करून मान्यता प्रदान करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय सावकारे (२५-०३-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सहकार व वस्त्रोद्योग विभागाचा शासन निर्णय क्रमांक सूतगि २१९३/प्र.क्र.१८६/टेक्स-१, दिनांक ११ ऑगस्ट, १९९३ नुसार सहकारी सूतगिरण्यांना १:९ या प्रमाणात शासकीय भागभांडवल पुरविण्यात येत होते. तथापि, राज्याचे एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ शासन निर्णय दिनांक ०२ जून, २०२३ लागू झाले असून सदर धोरणानुसार नवीन सहकारी सूतगिरण्यांसाठी सभासद भागभांडवल, शासकीय भागभांडवल आणि वित्तीय संस्थांकडून घेण्यात येणारे कर्ज याचे प्रमाण खालीलप्रमाणे जिल्ह्याचे झोन निहाय वर्गीकरण ठरविण्यात आलेले आहे.

| झोन | सभासद भागभांडवल | शासकीय भागभांडवल | वित्तीय संस्थेकडून कर्ज |
|---|---|---|---|
| झोन१ | ५ | ४५ | ५० |
| झोन२ | १० | ४० | ५० |
| झोन३ | १५ | ३५ | ५० |
| झोन४ | २० | ३० | ५० |

अर्थसहाय्यात घेण्यात येणारी सूतगिरणी ज्या झोन मध्ये येत असेल त्याप्रमाणे अर्थसहाय्याचे गुणोत्तरानुसार अर्थसहाय्य दिले जाते.
(२) राज्यातील अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या सहकारी सूतगिरण्यांना अनुक्रमे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व आदिवासी विभागाद्वारे शासकीय भागभांडवल व दिर्घ मुदती कर्ज प्रदान करण्यात येते. खालील सूतगिरण्यांना १०:४०:५० या तत्वावर खालील सहकारी सूतगिरण्यांची शासकीय अर्थसहाय्यासाठी निवड करण्यात आलेली आहे.
१) श्री.स्वामी विवेकानंद मागासवर्गीय सहकारी सूतगिरणी मर्या.कपीलापूरीं तालुका परांडा जिल्हा धाराशिव शासकीय अर्थसहाय्यसाठी शासन निर्णय दिनांक १६ मार्च, २०२४ अन्वये निवड करण्यात आली. आहे. शासन निर्णय दिनांक ११/०६/२०२५ अन्वये रुपये १३.६० कोटी शासन भागभांडवल प्रदान केले आहे. सद्य:स्थितीत सूतगिरणी उभारणी खाली आहे.
२) कै. मोहनरावजी अहीर मागासवर्गीय सहकारी सूतगिरणी मर्या. पेठवडज ता कंधार जिल्हा नांदेड शासकीय अर्थसहाय्यसाठी शासन निर्णय दिनांक ०४ ऑक्टोबर, २०२४ अन्वये निवड करण्यात आली.सदर सहकारी सूतगिरणीला अद्याप शासकीय अर्थसहाय्य प्राप्त झालेले नाही.
(३) १) समाजकल्याण, सांस्कृतीक कार्य व क्रिडा विभागाचा शासन निर्णय क्रमांक: एमपीसी/१०९९/प्र.क्र.२४४/विघयो-२ दिनांक ३० मार्च, २००० च्या शासन निर्णयातील अट क्रमांक १६ नुसार ७० टक्के पेक्षा जास्त अनुसूचित जातीचे सभासद असतील या सबंधीची खात्री सबंधित जिल्हा

समाजकल्याण अधिकारी व सबंधित विभागीय समाजकल्याण अधिकारी व संचालक समाजकल्याण यांनी खात्री करावयाची आहे. तसेच आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक १४/१०/१९९८ अन्वये आदिवासीसहकारी सूतगिरणीचे ८०% सभासद आदिवासी असणे आवश्यक आहे.
२) सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागामार्फत अनुसूचित जातीच्या सूत गिरणीला दीर्घ मुदतीचे कर्ज मंजूर करण्याबाबत मा.न्यायालयाने जात पडताळणी प्रमाणपत्र मागितले नाही असे नमूद केले आहे. तथापि, मागासवर्गीय (अनुसूचित जाती) सूत गिरण्या, शासनाच्या अनुसूचित जाती उप योजनेमधून मागासवर्गीय सूत गिरण्याना अर्थसहाय्य (दीर्घ मुदत्तीचे कर्ज) मंजूर करण्यापूर्वी मागासवर्गीय सभासद जात प्रमाणपत्र सादर करीत नसल्याचे किंवा जात प्रमाणपत्र सादर केले तरी ते वैध नसल्याच्या बाबी शासनाच्या निदर्शनास आलेल्या आहेत, त्यामुळे मागासवर्गीय सहकारी सूत गिरण्यांना अर्थसहाय्य (दीर्घ मुदतीचे कर्ज) मंजूर करण्यापूर्वी मागासवर्गीस सभासदाची जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे या विभागाचा शासन निर्णय, दिनांक १५ फेब्रुवारी, २०१६ अन्वये बंधनकारक करण्यात आलेले आहे.
३) आदिवासी विकास विभागाने सदर मुद्या लागू नाही असे नमूद केले आहे.
(४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागानूसार शेकडो सदस्यांची जात पडताळणी होणे शक्य आहे. कारण, त्या विभागामार्फत अनुसूचित जातीच्या सूत गिरण्यांना अर्थसहाय्य (दीर्घ मुदतीचे कर्ज) मंजूर करण्यापूर्वी शासन निर्णयान्वये बंधनकारक करण्यात आलेले अनुसूचित जातीच्या सभासदांचे जात वैधता प्रमाणपत्र घेतले जाते सदर जात वैधता घेण्याच्या धोरणात (कार्यपध्दतीत) बदल करण्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या विचाराधिन नसल्याचे नमुद केले आहे.
आदिवासी विकास विभागाने सदर मुद्या लागू नाही असे नमूद केले आहे.
(५) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागानूसार अनुसूचित जातीच्या सूत गिरण्यांना दीर्घ मुदतीचे कर्ज मंजूर करण्यापूर्वी अनुसूचित जातीच्या सूत गिरणी संचालकांची व प्रवर्तकांची जात पडताळणी करून मान्यता प्रदान करण्याबाबत निवेदन / पत्र / प्रस्ताव त्या विभागास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.आदिवासी विकास विभागाने सदर मुद्या लागू नाही असे नमूद केले आहे.
(६) लागू नाही.

---

## कोल्हापूर येथे एअर विंग एनसीसीचे प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याबाबत

**(४) २५३१ (१८-०७-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर, सांगली,सातारा,रत्नागिरी, सिंधुदूर्ग या ५ जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांना करीयरची नवीन संधी उपलब्ध करुन देऊ शकणारी एअरविंग एनसीसी कोल्हापूर हेडक्वार्टर सुरु करण्याबाबत एनसीसीसाठी योग्य जागेची निवड करणे तसेच निश्चित केलेल्या जमिनीचे अधिग्रहण करण्याची किंवा ती एनसीसी विभागाला हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू करणे. जमिनीचा ताबा मिळाल्यावर व तेथे उडडाण प्रशिक्षणाकरीता आवश्यक मान्यतेबाबत कार्यवाही पूर्ण झाल्यावर अभ्यासक्रम सुरु करता येईल, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमिनीचा ताबा मिळाल्यावर तिथे उड्डाण प्रशिक्षणासाठी आवश्यक पायाभूत सुविधा (उदा. प्रशिक्षण वर्ग, विमान देखभाल सुविधा, हॉस्टेल) विकसित करणे. तसेच DGCA ची मान्यता मिळण्यासाठी DGCA कडे अर्ज करणे, प्रशिक्षणाचे निकष पूर्ण करून सुरक्षा मानकांचे पालन करून आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार (०४-०५-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

कोल्हापूर विमानतळ येथे एनसीसीच्या एअर विंगसाठी उड्डाण प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून, त्यासाठी आवश्यक असलेली सुमारे २.३५ एकर जमीन उपलब्ध करून देण्यास भारतीय विमानतळ प्राधिकरण Airports Authority of India (AAI) कडून तत्त्वतः मान्यता देण्यात आलेली आहे.
(२) एअर विंगसाठी उड्डाण प्रशिक्षण केंद्र स्थापनेकरीता प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या प्रशिक्षण सुविधा जसे की प्रशिक्षण वर्ग, विमान देखभाल सुविधा, वसतिगृह आदींची उभारणीबाबत कार्यवाही जमीन हस्तांतरणाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतरच करता येईल.
(३) NCC कार्यालयाककडे इतर राज्यांतील विमानतळांवरील काही प्रलंबित देयके आहेत. जमीन हस्तांतरणासाठी ही देयके पूर्ण करणे आवश्यक आहे.तथापि,महाराष्ट्र राज्याचे कोणतीही थकबाकी नसली तरी, संपूर्ण प्रक्रिया इतर राज्यांवरील देयकांशी जोडलेली असल्यामुळे विलंब होत आहे. महाराष्ट्राचे प्रकरण इतर राज्यांपासून स्वतंत्रपणे हाताळण्याबाबत महासंचालक, एनसीसी यांनी पत्राद्यारे विनंती केली आहे. शासन स्तरावरून या प्रकरणी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे.

---

## मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळामध्ये आर्थिक अनियमितता झाल्याबाबत

**(५) ४६५४ (०८-१०-२०२५) श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळामध्ये लेखाधिकारी आणि कंपनी सेक्रेटरी कार्यरत नसताना महामंडळाने रुपये १००० कोटीच्या भागभांडवलाचे व्यवहार केले असल्याचे माहे सप्टेंबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अनियमिततेबाबतचा तपशिल संचालक श्री सलीम सारंग यांनी महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकाच्या निदर्शनास आणला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळामध्ये लेखाधिकारी आणि कंपनी सेक्रेटरी कार्यरत नसतानाही महामंडळाने रुपये १००० कोटीच्या भागभांडवलाचे व्यवहार केलेल्या अनियमिततेबाबत संबंधित दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार (२२-०५-२०२६) :** (१) हे खरे नाही.

मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे सद्य:स्थितीत मंजूर भागभांडवल रुपये ७००.०० कोटी असून मार्च २०२५ पर्यंत रुपये ६७१.५९१० कोटी इतके भागभांडवल शासनाने महामंडळास अदा केले आहे. यामधून मार्च, २०२५ पर्यंत महामंडळाचे रुपये २१०.८३ कोटी इतकी रक्कम विविध बँकामध्ये ठेवी स्वरूपात गुंतवणूक करण्यात आली आहे. तसेच राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त निगम, नवी दिल्ली (NMFDC) यांच्याकडून रुपये १७३.२७ कोटी इतका निधी कर्ज स्वरुपात प्राप्त झाला आहे. माहे डिसेंबर, २०२५ पर्यंत महामंडळाने विविध योजनांतर्गत, महामंडळाचे भागभांडवल व प्राप्त कर्ज निधी यामधून एकूण रुपये ६७०.७९ कोटी इतक्या निधीचे वाटप लाभार्थ्यांना केले आहे.

तसेच महामंडळाचे आर्थिक व्यवहारामध्ये कंपनी सेक्रेटरीची कोणतीही भूमिका नसते.

लेखाधिकारी यांची नेमणूक संचालनालय, लेखा व कोषागारे यांच्याकडून करण्यात येते. दिनांक ०८/०७/२०२५ रोजी लेखाधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तथापि, तत्पूर्वी महामंडळाचे दिनांक २१/१२/२०२४ ते दिनांक ०७/०७/२०२५ या कालावधीत महामंडळातील लेखाधिकारी पद रिक्त असताना महामंडळाकडून कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे वेतनावरील खर्च करण्यात आला आणि कर्ज योजनांवरील इतर खर्च महामंडळाच्या संचालक मंडळाच्या मान्यतेने करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

महामंडळाचे संचालक श्री.सारंग, यांनी त्यांच्या दिनांक ११/०३/२०२५ व दिनांक ०९/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये महामंडळातील वेगवेगळ्या बाबींच्या अनुषंगाने केवळ माहितीची मागणी केली होती. सदर माहिती श्री.सारंग यांना महामंडळाने दिनांक २४/०६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नावर दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याबाबत

**(६) ४८०९ (१४-१२-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गिरणी कामगारांच्या घरासंदर्भात आंदोलनादरम्यान गिरणी कामगार संघटनेचे पदाधिकारी व मा.उपमुख्यमंत्री यांचेसोबत दिनांक १० जुलै,२०२५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयाची अद्याप अंमलबजावणी केली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे या गिरणी कामगारांमध्ये नाराजी निर्माण होऊन त्यांनी पुन्हा आंदोलनाचा इशारा दिला असून या संदर्भात शासनाने माहिती घेऊन मुंबईतील गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न तातडीने सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२७-०४-२०२६) :** (१) व (२) दिनांक १० जुलै, २०२५ रोजी विधानभवनात मा.उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार दिनांक २९ डिसेंबर,

२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर महानगरपालिकेने वेगवेगळया पदांच्या भरती प्रक्रियेमध्ये दुरूस्ती करून शुध्दीपत्रक काढणेबाबत

**(७) ४८९३ (१४-१२-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेत विविध पदांच्या सरळ सेवा भरतीसाठी माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान काढण्यात आलेल्या जाहिरातीनुसार इतर मागासवर्ग (ओ.बी.सी.) प्रवर्गाकरीता फक्त ६ जागा आरक्षित केल्या गेल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १७४ जागांपैकी आरक्षणानुसार किमान ३४ जागा ओ.बी.सी. करीता आरक्षित ठेवणे बंधनकारक असताना सुध्दा फक्त ६ जागा ओ.बी.सी.च्या वाटयाला देण्यात असून नागपूर महानगर पालिकेने वेगवेगळया पदांच्या भरती प्रक्रियेमध्ये दुरूस्ती करून शुध्दीपत्रक काढण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-०५-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शासन निर्णय दिनांक १० मे २०२३ अन्वये नागपूर महानगरपालिकेसाठी एकूण १७९८१ पदांचा नवीन आकृतिबंध मंजूर करुन शासन निर्णय दिनांक ०८ डिसेंबर, २०२३ अन्वये नागपूर महानगरपालिकेच्या सेवा प्रवेश नियमास मान्यता प्रदान केली. त्यानुसार विभागीय आयुक्त, नागपूर कार्यालयाद्वारा बिंदुनामावली (रोस्टर) तपासणी करण्यात आली. नवीन आकृतीबंधानुसार रिक्त पदांची १००% पदभरती करावयाची नसल्याने केवळ अत्यावश्यक पदांची पदभरती करण्याच्या अनुषंगाने बिंदुनामावली (रोस्टर) तयार करुन दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ रोजी विविध १० संवर्गातील एकूण १७४ पदांची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. सदर जाहिरातीमधील संवर्ग निहाय व प्रवर्ग निहाय आरक्षण स्थिती निश्चित करतांना मंजूर पदे, कार्यरत पदे, व रिक्त पदांचा विचार करण्यात आला.

जाहिरातीतील काही संवर्गात कार्यरत कर्मचाऱ्यामध्ये इ.मा.व. प्रवर्गात अतिरीक्त कर्मचारी असल्याने नमुद जाहिरातीत त्यांचा विचार करुन प्रवर्ग निहाय आरक्षण नमुद करण्यात आले. त्यानंतर जाहिरातीच्या अनुषंगाने दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२५ व दिनांक ०८ ऑक्टोबर, २०२५ रोजी परीक्षा संपन्न होवून त्यांची प्रारुप निवड यादी व प्रतिक्षा यादी दिनांक २० फेब्रूवारी, २०२६ रोजी मनपाच्या अधिकृत संकेत स्थळावर प्रसिध्द केली आहे. त्यामूळे सदर पदभरती ही नियमानुसार झाल्याने शुध्दीपत्रक काढण्याची आवश्यकता नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## छत्रपती संभाजीनगर शहरातील वाहतूक सिग्नल यंत्रणा बंद पडल्याबाबत

**(८) ५१०६ (१४-१२-२०२५) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजी नगर शहरात वाहतूक कोंडी न होता सुरळीत वाहतूक होण्यासाठी ४३ चौकांमध्ये ६ कोटी १० लाख रुपयांचे वाहतूक सिग्नल बसविले असून यापैकी निम्म्याहून अधिक सिग्नल बदल पडले असल्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या उद्भवत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंठा (जि.जालना) येथील जालना रोडवर सिग्नल व गतीरोधक नसल्यामुळे ५० पेक्षा जास्त नागरीकांचा नाहक अपघातामुळे मृत्यूमुखी पडले असून, या रस्त्यावर मोटार सायकलचे अपघात होत असल्याने प्रवासी जखमी देखील होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त दोन्ही शहरातील किती वाहतूक सिग्नल किती कालावधी पासून बंद आहेत, त्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, छत्रपती संभाजी नगर शहरातील व जालना रोडवरील सिग्नल यंत्रणा व गतीरोधक उभी करुन शहरातील वाहतूक सुरळीत राहण्यासाठी सर्व वाहतूक सिग्नल सुरु ठेवण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे आहेत?

**श्री.एकनाथ शिंदे (२७-०४-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही,

(३) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने सादर केलेल्या माहितीनुसार छत्रपती संभाजीनगर शहरात ४३ वाहतूक सिग्नल बसविण्यात आले असून सदर सिग्नल चालू आहेत. त्यापैकी केवळ २ सिग्नल रस्ता रुंदीकरण व चौक सुशोभिकरण करण्याचे काम चालू असल्यामुळे बंद ठेवण्यात आले होते.

नगरपंचायत मंठा यांनी सादर केलेल्या माहितीनुसार मंठा शहरातील हद्दीमध्ये वाहतूक सिग्नल नाहीत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण - डोबिवली महानगरपालिकेमधील मुख्य उदयान अधीक्षक यांना शासन नियमाचे उल्लंघन करुन उपायुक्त पदाचा कार्यभार दिल्याबाबत

**(९) ५१८९ (१४-१२-२०२५) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेमधील मुख्य उदयान अधीक्षक यांना उपायुक्त पदाचा कार्यभार तांत्रिक कर्मचारी असताना दिलेला असून शासन नियमाप्रमाणे उपायुक्त पदाचा कार्यभार तांत्रिक कर्मचारी असताना देता येत नाही हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन नियमाचे उल्लंघन करुन उपायुक्त पदाचा कार्यभार देण्यामागची कारणे काय आहेत, यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच उक्त

उपायुक्त पदाचा कार्यभार तात्काळ काढून घेण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०५-०५-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

नगरविकास विभागाच्या दिनांक ४ मे, २००६ शासन निर्णयानुसार उद्यान विभागाचा समावेश प्रशासकीय सेवेत होत आहे. तथापि, मुख्य उद्यान अधीक्षक पदाची अर्हता व सेवा प्रवेश नियम, २०१० आणि २०२१ नुसार सदर पद हे तांत्रिक सेवेमध्ये येत आहे.

प्रशासकीय कामकाजाच्या सोईसाठी मुख्य उद्यान अधीक्षक पदावर कार्यरत अधिकारी यांना उपायुक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार तात्पुरत्या स्वरुपात सोपविण्यात आलेला आहे. त्यापदावर कोणतीही कायमस्वरुपी नियुक्ती देण्यात आलेली नाही.
(२) प्रशासकीय कामकाजाच्या सोयीसाठी मुख्य उद्यान अधीक्षक यांना त्यांचे मूळ कामकाज सांभाळून उप आयुक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. तथापि, त्यांना उप आयुक्त या पदावर कायमस्वरूपी नियुक्ती देण्यात आलेली नाही. सबब, सदर प्रकरणी कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर महानगरपालिकेमार्फत स्पर्धा परीक्षा केंद्र सुरु करण्याबाबत

**(१०) ५७६३ (१४-१२-२०२५) श्री.संदीप जोशी, श्री.वसंत खंडेलवाल, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर महानगरपालिकेमार्फत शहरातील विद्यार्थ्यांसाठी एम.पी.एस.सी. (राज्यसेवा) आणि यु.पी.एस.सी. (सिव्हील सर्विसेस) प्रशिक्षण देण्याचा निर्णय सन २०२१-२०२२ च्या अर्थसंकल्पामध्ये घेण्यात आला असून त्यासाठी समाजकल्याण विभागातर्फे प्रस्ताव तयार करुन जागेची पाहणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पश्चिम महाराष्ट्रातील पिंपरी चिंचवड, ठाणे, अहमदनगर, अंबरनाथ येथील महानगरपालिकांनी विद्यार्थ्यांकरीता स्वत:चे स्पर्धा परीक्षा केंद्र सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूर महानगरपालिकेने गत पाच वर्षांपासून एम.पी.एस.सी. (राज्यसेवा) आणि यु.पी.एस.सी. (सिव्हील सर्विसेस) प्रशिक्षणाचा निर्णय घेवूनही स्पर्धा परीक्षा केंद्र सुरु न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर प्रकरणी माहिती घेऊन नागपूर येथे स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र लवकरात लवकर सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-०५-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) होय हे खरे आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका व यशदा, बाणेर रोड, पुणे या दोन संस्थामध्ये जानेवारी- २०२३ मध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार सन २०२२-२३ पासून सावित्रीबाई फुले अकादमी, वाकड हे युपीएससी प्रशिक्षण केंद्र सुरू आहे.

ठाणे महानगरपालिकेमार्फत सन १९८७ पासून यु.पी.एस.सी.मार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांना नि:शुल्क मार्गदर्शन करणारी चिंतामणराव देशमूख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था स्थापन केली आहे.

अहिल्यानगर महानगरपालिकेमार्फत सन २००७ साली स्पर्धा परीक्षा केंद्र चालू करण्यात आले होते परंतु सन २०१९ च्या कोव्हीड काळानंतर सदर केंद्र बंद झाले आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील घाटकोपरमध्ये रेशनधान्य साठा जप्त केल्याबाबत

**(११) ७१४४ (२४-०३-२०२६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत मोठ्या प्रमाणात ठिकठिकाणी रेशनच्या धान्याचा काळाबाजार सुरु असून घाटकोपर (प.) जागृतीनगर मेट्रो स्थानकाखाली रिक्षातून काळया बाजारात नेण्यात येणारा रुपये ८४ हजार ४०० रुपये एवढया रक्कमेचा रेशनिंगच्या धान्याचा साठा घाटकोपर पोलीसांनी ताब्यात घेतला असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने माहिती घेवून सदरील रेशनधान्य तस्करांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (२९-०४-२०२६) :** (१) दिनांक १९/१२/२०२५ रोजी जागृतीनगर, घाटकोपर, मुंबई मेट्रो ब्रिज खाली तांदूळाच्या गोण्या, रिक्षातून अवैधरित्या वाहतूक करत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे संबंधित रिक्षासह एकूण धान्याच्या १२ गोण्या जप्त करण्यात आल्या. सदर जप्त मुद्देमालाची एकूण किंमत रुपये ८४,४००/- इतकी आहे.

(२) या प्रकरणी श्री.तारांचंद गुप्ता व इतर दोन अशा तीन व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र अन्नधान्य शिधावाटप (व्दितीय) आदेश, १९६६ अन्वये घाटकोपर, मुंबई पोलीस ठाणे येथे एफ.आय.आर.क्र.१४८१/२०२५,दिनांक २०/१२/२०२५ नोंदविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मानसरोवर व खांदेश्वर स्थानकांचे काम त्वरीत सुरू करणेबाबत

**(१२) ७६३० (२४-०३-२०२६) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार, नवी मुंबई उपनगरीय रेल्वेच्या विकासाची जबाबदारी सिडकोने रेल्वे मंत्रालयाअंतर्गत मध्य रेल्वे (CR) यांच्या भागीदारीत घेतलेली असून या भागीदारीत खर्चाचे योगदान सिडकोकडून २/३ आणि मध्य रेल्वेकडून १/३ असे असून या भागीदारीअंतर्गत, नवी मुंबई आणि अमृत भारत स्थानकांच्या इतर स्थानकांप्रमाणेच आधुनिक सुविधांसह प्लॅटफॉर्म, कॉन्कोर्स (रेल्वे-स्टेशनच्या इमारतीमधला मोठा प्रशस्त हॉल), तिकीट लॉबी, पार्किंग, भुयारी मार्ग/पादचारी पूल (FOB) यांसारख्या स्थानकांचा विकास सिडकोमार्फत केले जाते आणि ट्रॅकचे काम मध्य रेल्वेमार्फत केले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागीदारीअंतर्गत स्थानकांचा विकास करण्याच्या अनुषंगाने प्लॅटफॉर्म, कॉन्कोर्स (रेल्वे-स्टेशनच्या इमारतीधील मोठा प्रशस्त हॉल), तिकीट लॉबी, पार्किंग, भुयारी मार्ग/पादचारी पूल (FOB) तसेच नवी मुंबईतील इतर स्थानके व अमृत भारत स्थानकांप्रमाणे आधुनिक सुविधा, हे काम सिडकोमार्फत केले जाते आणि ट्रॅकचे काम मध्य रेल्वेमार्फत केले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पनवेल व खारघर रेल्वे स्थानकांचे काम देखील याच तत्वावर करण्यात आले असून खारघर आणि पनवेल स्थानकांच्या धर्तीवर सिडकोद्वारे विकसित करायची असलेली दोन स्थानके मानसरोवर व खांदेश्वर अद्याप प्रलंबित असून सदरची स्थानके विकसित करण्याचे काम सिडकोकडून करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३०-०४-२०२६) :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे,

नवी मुंबई येथील रेल्वे प्रकल्प विकासाकरीता, सिडको आणि मध्य रेल्वे सोबत करण्यात आलेल्या भागीदारी तत्वावर आधारीत करारनाम्यानुसार, सिडकोमार्फत कामे करण्यात आलेली आहेत आणि रेल्वे ट्रॅकची कामे मध्य रेल्वेमार्फत करण्यात आलेली आहेत. तथापि, अमृत भारत स्थानक योजना या करारनाम्यांमधे समाविष्ट नाही. उपस्थित केलेल्या प्रश्नातील मानसरोवर व खांदेश्वर तसेच नवी मुंबईतील इतर उपनगरीय रेल्वे स्थानके अमृत भारत योजना अंतर्गत समाविष्ट नाहीत.

(३) बेलापूर पनवेल रेल्वे कॉरिडॉर अंतर्गत खारघर आणि पनवेल उपनगरीय स्थानकांच्या धर्तीवर मानसरोवर व खांदेश्वर उपनगरीय स्थानकांमधील प्लॅटफॉर्म, तिकीट लॉबी, भुयारी मार्ग इ. विकासाची कामे सिडकोमार्फत पूर्ण करण्यात आलेली आहेत आणि रेल्वे ट्रॅकची कामे मध्य रेल्वेमार्फत करण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय धान खरेदी प्रक्रिया सुलभ करण्याबाबत

**(१३) ८२०६ (२४-०३-२०२६) डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरीप हंगाम सन २०२५-२६ अंतर्गत शासकीय धान खरेदीत तांत्रिक अडचणी, ऑनलाइन नोंदणीतील

विलंब आणि मयार्दांमुळे अनेक ठिकाणी खरेदी प्रक्रिया प्रलंबित राहिल्याची आणि शेतकरी नोंदणीच्या प्रतीक्षेत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय खरेदी केंद्रांवर गर्दी वाढणे, ऑनलाइन नोंदणीसाठी आवश्यक मर्यादा (लिमिट) संपणे तसेच प्रणालीतील तांत्रिक अडचणींमुळे शेतकऱ्यांचे धान वेळेत खरेदी न झाल्याने त्यांचे धान खुले बाजारात कमी दराने विकण्याची वेळ येत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ऑनलाइन नोंदणी व खरेदी प्रक्रिया वेळेत सुरू न झाल्यामुळे शेतकऱ्यांचे धान गोदामात साठवून ठेवावे लागत असून, त्यामुळे साठवणूक खर्च, नुकसान व आर्थिक अडचणी वाढत असून शासकीय हमीभाव योजनेचा उद्देश बाधित होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासकीय खरेदी प्रक्रियेत नियोजनाचा अभाव, अपुरी खरेदी केंद्रे, मनुष्यबळाची कमतरता व ऑनलाइन प्रणालीतील त्रुटी यांमुळे शेतकऱ्यांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत असून, यामुळे शासकीय निधीचा अपेक्षित परिणाम साधला जात नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने शासकीय धान खरेदी प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुलभ व शेतकरी-केंद्रित करण्यासाठी शासन आवश्यक सुधारणा करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही वा उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (२१-०५-२०२६) :** (१) किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत BeAM पोर्टलव्दारे ऑनलाईन शेतकरी नोंदणी प्रक्रिया राबविण्यात आली.
(२) किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत राज्य शासनास १०.४८ लाख मे. टन धान खरेदी उद्दिष्ट प्राप्त होते. हे धान खरेदी उद्दिष्ट वाढविण्यासाठी दिनांक १० फेब्रुवारी, २०२६ रोजी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्यामार्फत केंद्र शासनास विनंती करण्यात आली. तथापि, अतिरक्त उदिष्ट प्राप्त झाले नाही.
(३) हे खरे नाही.
खरीप पणन हंगाम २०२५-२६ मध्ये राज्यात सुरुवातीला दिनांक २७/१०/२०२५ ते दिनांक ३१/१२/ २०२५ पर्यंत व तद्नंतर दिनांक ०१ जानेवारी, २०२६ ते ३१ जानेवारी, २०२६ पर्यंत एकूण २ वेळा शासनाकडून ऑनलाईन शेतकरी नोंदणीस मुदतवाढ देण्यात आली होती.
(४) हे खरे नाही.
(५) आधारभुत किंमत खरेदी योजना प्रभावीपणे राबविण्याकरीता BeAM पोर्टलचा वापर करण्यात येत आहे. आधार क्रमांक प्रमाणीकरणानुसार आयरीस मशिनचा वापर करुन शेतकरी नोंदणी करण्यात येत असून धानाची खरेदी झाल्यानंतर शेकऱ्यांना त्यांचे धानाचे चुकारे थेट त्यांच्या बँक खात्यात ऑनलईन पध्दतीने अदा करण्यात येतात.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

## मुंबईतील गिरणी कामगारांच्या आश्वासनांची पूर्तता करण्याबाबत

**(१४) ८५३६ (२८-०२-२०२६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरणी कामगारांना घरे देण्याबाबत आश्वासन देवूनही प्रत्यक्षात त्याची पूर्तता न झाल्याने संतप्त गिरणी कामगार संघटनांनी आक्रमक भूमिका घेत, 'गिरणी कामगार संयुक्त लढा समिती'च्या वतीने दिनांक १० मार्च २०२६ रोजी विधानभवनावर मोर्चा काढण्याचा इशारा दिल्याची बाब माहे फेब्रुवारी २०२६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गिरणी कामगार संघटनांची मुंबई शहरातच पात्र गिरणी कामगारांना घरे देण्याची ठाम मागणी असून, मुंबईबाहेरील पर्याय त्यांना मान्य नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गिरणी कामगारांच्या घरांसंदर्भात प्रलंबित पात्रता पडताळणी, सोडत प्रक्रिया, बांधकाम प्रगती व घरवाटप याबाबत शासनाने आतापर्यंत कोणती ठोस कार्यवाही केली आहे, यासाठी स्वतंत्र कृती आराखडा व कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे काय,

(४) अद्यापही मोठ्या संख्येने पात्र गिरणी कामगारांना घरे मिळालेली नसल्यास, त्यामागील प्रशासकीय, कायदेशीर किंवा भूखंड उपलब्धतेसंदर्भातील अडचणी कोणत्या आहेत, तसेच मुंबईतील गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न तातडीने सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-०३-२०२६) :** (१) सर्व श्रमिक संघटना (गिरणी कामगार विभाग) यांनी गिरणी कामगारांचा आझाद मैदानावर मोर्चा काढणार असल्याचे पत्रक दिले आहे.

(२) गिरणी कामगारांकडून ऑनलाईन पध्दतीने (आधारकार्ड आधारीत) शेलू व वांगणी येथील घरांबाबत संमती घेण्यात आली असता त्यामध्ये ८,७८१ गिरणी कामगार/त्यांचे वारस यांनी शेलू वांगणी येथील घरांसाठी संमती दर्शविली आहे. तर, ४,१०० गिरणी कामगारांनी शेलू व वांगणी येथील घरांसाठी संमती दर्शविलेली नाही. त्याप्रमाणे, काही गिरणी कामगार/त्यांच्या वारसांनी त्यांच्या जिल्ह्याच्या ठिकाणी घरे मिळण्याबाबत शासनास विनंती केली आहे.

(३) आतापर्यंत गिरणी कामगारांना १५,८७० सदनिका वितरीत करण्यात आल्या आहेत. उर्वरित गिरणी कामगारांची पात्रता तपासण्यात आली असून म्हाडा व कामगार विभागाने घेतलेल्या विशेष मोहिमेंतर्गत आतापर्यंत एकूण १,०७,३८६ गिरणी कामगारांपैकी ९८,६१९ गिरणी कामगारांचे अर्ज पात्र झाले आहेत.

(४) बृहन्मुंबईतील ५८ बंद गिरण्यांपैकी ३७ गिरण्यांमधील जमिनीचा वाटा गिरणी कामगारांच्या घरांसाठी निश्चित झाला आहे. त्यापैकी २६ गिरण्यांच्या जमिनीवर बांधकाम पूर्ण करुन १३,४५३ सदनिकांचे वितरण करण्यात आले आहे. ४ गिरण्यांची जागा म्हाडास प्राप्त झालेली नाही. उर्वरित ७ गिरण्यांच्या जागेपैकी २ गिरण्यांच्या जागेवर सदनिकांचे बांधकाम सुरू आहे. तसेच ५ गिरण्यांच्या जागेच्या बदल्यात प्राप्त झालेल्या भूखंडावरील आरक्षण बदलण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. त्याचप्रमाणे मुंबईतील बंद/आजारी गिरण्यांमधील गिरणी कामगारांसाठी मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामध्ये घरकुले उपलब्ध करुन देण्याबाबत दिनांक १५/०३/२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात

येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर आरोग्य व शारीरिक शिक्षण हे मुख्य विषय म्हणून समाविष्ट करण्याबाबत

**(१५) १९२४२ (०४-०८-२०२३) श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय शैक्षणिक आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील शालेय अभ्यासक्रमाच्या विषय आराखड्यात आरोग्य व शारीरिक शिक्षण हा विषय मुख्य विषय म्हणून समविष्ट असून त्यासाठी कायमस्वरुपी पूर्णवेळ शारीरिक शिक्षण शिक्षकांची नेमणूक करण्यात येत होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१५ मध्ये शासन निर्णयानुसार वर्ग ६ वी ते ८ वी उच्च प्राथमिक सहाय्यक शिक्षक नेमणूकीमधून शारीरिक शिक्षण शिक्षकांची पदे व्यपगत करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरील पदांमध्ये बीपीएड,एमपीएड तसेच शारीरिक शिक्षण शिक्षक यांना अर्हतेनुसार प्राधान्य देऊन संधी देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग अभ्यासक्रमांच्या संच मान्यतेमध्ये शारीरिक शिक्षण शिक्षक पदाचा समावेश करण्याबाबत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शारीरिक शिक्षण शिक्षक महामंडळ, पुणे यांनी माहे फेब्रुवारी,२०२३ च्या दरम्यान मा.मुख्यमंत्री व शालेय शिक्षण मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०१-०६-२०२६) :** (१), (२), (३), (४) व (५) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० मधील तरतूदींशी सुसंगती असावी म्हणून दिनांक १५/०३/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये कला व क्रीडा विषयांच्या शिक्षकांचा संच मान्यतेत समावेश करण्यात आला आहे. शासन निर्णय, दिनांक १५/०३/२०२४ अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय, खाजगी अनुदानित, अंशत: अनुदानित माध्यमिक शाळांसाठी इयत्ता १ ली ते १० वी च्या २५१ पेक्षा अधिक विद्यार्थ्यांमागे ०१ विशेष शिक्षक (क्रीडा) व इयत्ता ८ वी ते १० वी च्या १५१ पेक्षा अधिक विद्यार्थ्यांमागे ०१ विशेष शिक्षक (क्रीडा) पद अनुज्ञेय करण्यात आले आहे. तसेच त्यापुढे विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात क्रीडा शिक्षकांची पदे अनुज्ञेय करण्याची तरतूद उक्त शासन निर्णयामध्ये करण्यात आली आहे.

संच मान्यतेत कला व क्रीडा विषयांच्या शिक्षकांचा समावेश झाल्याने शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी-२०२५ मध्ये प्राप्त गुणांच्या आधारे या पदांवर भरती होणार आहे. यासाठी सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी संचमान्यतेनुसार उपलब्ध होणाऱ्या पदांची जाहिरात पवित्र पोर्टलवर प्रसिध्द करणे

आवश्यक आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेचा कोट्यवधी रुपयांचा निधी नियमबाह्य कामांसाठी खर्च केला जात असल्याबाबत

**(१६) २२९५९ (१६-०७-२०२४) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या निर्देशानुसार शहरातील उड्डाणपूल व झाडांची रोषणाई, मेट्रो प्रकल्प, गिरणी कामगारांची घरे, कोस्टल रोडचा संलग्न भाग असलेल्या दहिसर – भाईंदर मार्ग, सिद्धीविनायक मंदिर परिसराचे सुशोभिकरण, स्वच्छ मुंबई मोहिम, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या अखत्यारीतील कामे अशा अनेक नियोजनबाह्य कामांसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रशासक राजवटीत अनुक्रमे १,७००, १,०००, ३०००, ४०००, ५००, ३००, ५ कोटी रुपयांचा खर्च केला जात असल्याची गंभीर बाब दिनांक १२ एप्रिल, २०२४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून उत्पन्नाचा स्त्रोत वाढत नसताना लाखों रुपयांचे प्रकल्प हाती घेण्यात येत असतानाही बृहन्मुंबई महानगरपालिकेवर विविध योजना राबविण्यासाठी सक्ती केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेची स्वायत्तता अबाधित राखण्यासाठी व आर्थिक खर्चाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेव्दारे भांडवली अर्थसंकल्प २०२४-२५ मध्ये १) कोस्टल रोडचा संलग्र भाग असलेल्या दहिसर-भाईंदर मार्ग याकरीता लेखा संकेतांक ५०४५००२७१ (कोस्टल रोडच्या शेवटच्या टप्प्यात दहिसर-भाईंदर लिंक रोड बांधकामासाठी तरतूद) अंतर्गत एम. रुपये २२० कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

(२) सिध्दिविनायक मंदीर परिसराचे सुशोभिकरणाकरीता लेखा संकेतांक ५०४१००८३१ (जी/उत्तर विभागातील सिध्दिविनायक मंदीराच्या सभोवतालच्या परिसराचे सुशोभिकरण करण्याकरीता तरतूद) अंतर्गत रुपये २५ कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

(३) स्वच्छ मुंबई मोहिमकरीता महसूली अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२४-२५ मध्ये लेखा संकेतांक i) २३०८०३१२१ (डिप क्लिनिंग ड्राईव्ह घकव्य स्वच्छता करणे) मध्ये रुपये ७२ कोटी, ii) २३०८०३१२० (डिप क्लिनिंग ड्राईव्ह इतर खाते) मध्ये रुपये ३० कोटी, iii) २३०८०३१२२ (डिप क्लिनिंग ड्राईव्ह-(डिप क्लिनिंग संबंधित कामे) मध्ये रुपये २५८ कोटी अशी एकूण रुपये ३६० कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२४-२५ मध्ये शहरातील उड्डाणपूल व झाडांची रोपणाई याकरीता कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही.

त्याचप्रमाणे मेट्रो प्रकल्प, गिरणी कामगारांची घरे, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या अखत्यारितील

कामे सदर बाबी बृहन्मुंबई महानगरपालिकेशी सबंधित नाहीत.
(२) व (३) हे खरे नाही
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहर आणि उपनगरातून वाहणाऱ्या मिठी नदीचे खोलीकरण, रुंदीकरण आणि सौंदर्यीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१७) २३११७ (१६-०७-२०२४) श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.प्रसाद लाड, श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १८८८३ ला दिनांक २ ऑगस्ट, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत दिनांक २६ जुलै, २००५ रोजी वा त्यासुमारास झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे शासनाने मिठी नदी विकास संरक्षण प्राधिकरणाची स्थापना व तात्कालीन केंद्र शासनाने आर्थिक मदतीची घोषणा करुन मुंबई शहर आणि उपनगरातून वाहणाऱ्या १७.८ किमी लांबीच्या मिठी नदीचे खोलीकरण, रुंदीकरण आणि सौंदर्यीकरणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने गत १८ वर्षापासून रुपये १ हजार ६५० कोटीहून अधिक रक्कम खर्च करूनही मिठी नदीचे सौदर्यीकरण पूर्ण झाले नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्य:स्थितीत मिठी नदी परिसरात बेकायदा बांधकामामुळे मिठी रुंदीकरणाचे कामाला अडसर येत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मिठी नदीवरील सर्व अतिक्रमणे निष्कासीत करुन मिठी नदीचे रुंदीकरण, खोलीकरण करणे संरक्षक भिंत बांधणे, सेवा रस्ता बांधणे, तसेच छोट्या नाल्यांमधून मिठी नदीमध्ये उत्सर्जित होणारे सांडपाणी अडवून मलनिस्सारण वाहिनीमध्ये वळविण्याची कामे हाती घेण्यात आली आहेत काय, तसेच सदर मिठी नदी परिसराच्या सुशोभीकरण कुंपणाची उभारणी या कामांमध्ये नेमका किती खर्च झाला आहे,
(४) असल्यास, प्रत्येक पावसाळ्यापूर्वी मुंबईतील मिठी नदीचा गाळ काढण्याबाबत दरवर्षी बृहन्मुंबई महानगरपालिका आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना सूचना दिल्या जात असून गत १९ वर्षपासून आतापर्यंत रुपये १ हजार ६५० कोटीहून अधिक रक्कम खर्च करण्यात आल्यामुळे या कामाची चौकशी करण्याचे निर्देश दिले असून चौकशीची कार्यकक्षा ठरवून सदर चौकशी किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे,
(५) असल्यास, या आधीची कामे प्रलंबित असतानाही मिठी नदीला २८ फ्लड गेट बसविण्याचा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिकेने घेतला असून सदरील फ्लड गेट बसविण्यासाठी रुपये १ हजार ९५० कोटी खर्च अपेक्षित असून सदरील प्रकल्प पूर्ण होण्यासाठी ४ वर्षाचा कालावधी लागणार असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, मिठी नदीचा गाळ काढणे, कंत्राटदार, कथित खर्चातील अनियमितता, नदीचे रुंदीकरण व स्वच्छतेच्या कामाबाबत भारताचे नियंत्रक व महालेखापाल (कॅग) यांनी आक्षेप घेतले असून सन २०२३ च्या विधीमंडळ अधिवेशनात सदर प्रकरणी प्रश्न उपस्थित करुनही १७.८ किमी लांबीच्या मिठी नदीचे

आजपर्यंत रुंदीकरण व स्वच्छता झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय शहराला पूरस्थितीपासून वाचविण्यासाठी मुंबईतील महत्वाच्या मानल्या जाणाऱ्या मिठी नदी परिसरातील सर्व अतिक्रमणे निष्कासीत करुन गाळ काढण्याच्या कामातील अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाई करुन मिठी नदीचे पुनरुज्जीवन करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-०४-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

दिनांक २६ जुलै, २००५ रोजीच्या अतिवृष्टीनंतर महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय दिनांक १९ ऑगस्ट,२००५ अन्वये मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाची स्थापना केली. सदर शासन निर्णयान्वये १७.८४ किमी लांबीच्या मिठी नदीचा फील्टरपाडा, पवई ते सी.एस.टी. पूल, कुर्ला दरम्यान एकूण ११.८४ किमी लांबीची विकास कामे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत व सी. एस. टी. पूल, कुर्ला ते माहिम कॉजवे दरम्यान एकूण ६.० किमी लांबीची विकास कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) मार्फत मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण यांच्या मार्गदर्शनांतर्गत दोन टप्प्यांमध्ये (टप्पा-१ व टप्पा-२) करण्यात आली. त्यामध्ये मुख्यतः रुंदीकरण, खोलीकरण, संरक्षक भिंत व सेवा रस्त्यांचे काम अंतर्भूत होते. सदर टप्पा-१ अंतर्गत मिठी नदीचे १६ ते ६० मी. इतके रुंदीकरण व गाळ काढण्याचे काम माहे एप्रिल २००६ ते जून २००६ दरम्यान पूर्ण करण्यात आले. सदर कामाकरीता रुपये ३१.८८ कोटी इतका खर्च झालेला आहे. टप्पा-२ अंतर्गत सन २००७ ते २०१९ दरम्यान चितळे समिती, केंद्रीय जल व विद्युत अनुसंधान संस्था आणि आय.आय.टी. मुंबई यांनी सादर केलेल्या अहवाल / शिफारशीनुसार, तसेच मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण यांच्याद्वारे तयार करण्यात आलेल्या मिठी नदी विकास आराखड्यानुसार, मिठी नदीचे अतिरिक्त रुंदीकरण, खोलीकरण, संरक्षक भिंत व सेवा रस्ता बांधण्याचे काम अंतर्भूत केलेले होते. त्यामधील रुंदीकरण व खोलीकरण, संरक्षक भिंत बांधणे व सेवा रस्ता बांधणे इत्यादी बहुतांश कामे करण्यात आली. सदर कामांकरीता सुमारे रुपये ५९० कोटी इतका खर्च करण्यात आला आहे. तसेच, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या निर्देशानुसार मनपा तर्फे मिठी नदी प्रदूषण नियंत्रण प्रकल्प हाती घेण्यात आलेला असून, उपरोक्त नमूद टप्पा-२ अंतर्गत उर्वरित कामे सन २०१९ मध्ये मिठी नदी प्रदूषण नियंत्रण प्रकल्प (पॅकेज-२) मध्यें अंतर्भूत करण्यात आली.

अद्यापी मिठी नदीच्या सौंदर्यीकरणासाठी कोणतेही काम हाती घेण्यात आलेले नाही व सौंदर्यीकरण करण्याकरीता कोणताही खर्च करण्यात आलेला नाही.

(२) हे खरे नाही.

एम.एम.आर.डी.ए. च्या अखत्यारीत असलेल्या मिठी नदीचे ६.०० किमी लांबीपैकी टॅक्सीमन कॉलोनी (एल विभाग) येथे उर्वरित असलेले ३०० मीटर लांबीच्या रुंदीकरणाचे काम मिठी नदी प्रदूषण नियंत्रण प्रकल्प (पैकेज-३) च्या मसूदा निविदेत अंतर्भूत करण्यात आलेले आहे.

(३) सदर कामांकरीता सुमारे रुपये ५९० कोटी इतका खर्च करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) हे अंशतःखरे आहे.

मिठी नदी प्रदूषण नियंत्रण प्रकल्प (पॅकेज-३) अंतर्गत, भरती प्रवण क्षेत्रातील मिठी नदी व वाकोला नदीत एकूण २६ पातमुखांद्वारे उत्सर्जीत होणारे सांडपाणी अडवून ते मिठी नदीच्या किनाऱ्यालगत नियोजित ८३४३ मीटर लांबी एवढ्या मलनिःसारण वाहिन्यांद्वारे मुख्य मलनिःसारण वाहिन्यांमध्ये वळविणे तसेच, मिठी नदीचे एम.एम.आर.डी.ए. च्या अखत्यारीत असलेल्या भागाचे उर्वरित ३०० मीटर लांबीचे रुंदीकरण व खोलीकरण, ६७८० मीटर लांबीची संरक्षक भिंत, ६४२१ मीटर लांबीचा सेवा रस्ता, ८८५० मीटर लांबीचा प्रोमनेड व २५ पातमुखांवर उदंचन संचासहित पूर नियंत्रण दरवाजे बांधण्याची कामे अंतर्भूत आहेत. सदर कामाचे प्रचलन व परिरक्षण कालावधी १० वर्षे इतका असणार आहे. सदर कामाची रु १९२० करोड इतक्या अंदाजित सुधारित रकमेची निविदा माहे, फेब्रवारी २०२४ मध्ये मागविण्यात आली होती. परंतु, प्रतिसाद न मिळाल्यामुळे सदर निविदा रद्द करावी लागली. सद्य:स्थितीत पॅकेज-३ च्या कामाची सुधारित मसुदा निविदा सल्लागारामार्फत तयार करण्यात येत असून प्रशासकीय मंजुरीची प्रक्रिया प्रगतिपथावर आहे.

(६) हे खरे नाही.

येथे असे नमूद करण्यात येते की मनपातर्फे मिठी नदीतील गाळ काढण्याचे काम हे द्विवार्षिक कंत्राटाद्वारे करण्यात येते व प्रतिवर्षी मिठी नदीतील गाळ काढण्याचे काम दोन टप्प्यांमध्ये (एकूण वार्षिक परिमाणाच्या ८० टक्के पावसाळ्यापूर्वी व २० टक्के पावसाळयादरम्यान / पावसाळयानंतर) करण्यात येते.
मिठी नदीचा विमानतळ पूल ते माहीम कॉजवे दरम्यानचा भाग भरती प्रवण क्षेत्रात येत असून सदर भागात नदीचा तळ समतल आहे व सदर भागात नदीची रुंदी १०० ते २२० मीटर एवढी आहे. त्यामुळे सदर भागात नियमित अवसादन (सेडिमेंटेशन) होऊन अतिरिक्त गाळ साठतो. तसेच, भरती प्रवण क्षेत्र वगळता मिठी नदीमध्ये मोठ्या प्रमाणात जलपर्णी उगवत असते. मिठी नदीच्या तीरांलगत बहुतांष ठिकाणी अतिक्रमणे असल्याकारणाने नदीत दररोज विविध पातमुखांद्वारे तरंगता कचरा येतो. तद्नुसार, नदीतील गाळ, तरंगता कचरा व जलपर्णी काढण्याच्या कामात सुलभता व मिठी नदीची कार्यक्षमता वाढवून परिमाणकारकरित्या काम करण्याकरीता आधुनिक पध्दतीच्या यंत्रसामुग्रीचा वापर करण्यात येत आहे.

तसेच, मिठी नदीचे प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी लघु मुदतीची (पॅकेज-१) व दीर्घ मुदतीची (पॅकेज-२, ३ व ४) कामे सुचविली आहेत, व त्यातील पॅकेज-१ मधील कामे पूर्ण झालेली असून, पॅकेज-२ व ४ मधील कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच, पॅकेज-३ च्या कामाची सुधारित मसुदा निविदा सल्लागारामार्फत तयार करण्यात येत असून प्रशासकीय मंजुरीची प्रक्रिया प्रगतिपथावर आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सहायक आयुक्तांच्या नियमबाहय पध्दतीने केलेल्या नियुक्तीबाबत

**(१८) २३६२४ (१६-०७-२०२४) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेशी संबंधित "सहायक आयुक्तांच्या" नियमबाहय पध्दतीने केलेल्या नियुक्तीसंदर्भात मा.उद्योगमंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या उत्तरांच्या अनुषंगाने लोकप्रतिनिधिंनी दिनांक ३ जानेवारी, २०२४, दिनांक २५ जानेवारी, २०२४ आणि २८ मार्च, २०२४ रोजी मा.उद्योग मंत्री महोदयांकडे सातत्याने पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मा.उद्योग मंत्री यांनी सभागृहात दिलेल्या उत्तरानुसार अदयाप कोणती कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-०२-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मा.लोकप्रतिनिधींनी दिनांक ०३ जानेवारी २०२४ व दिनांक २५ जानेवारी, २०२४ रोजी निवेदन दिले आहे.

(२), (३), व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सहाय्यक आयुक्त संवर्गातील १६ रिक्त पदांकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवेने भरण्याकरीता, जाहिरातीच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत परीक्षा तसेच मुलाखती घेण्यात आल्या. 'सहाय्यक आयुक्त' संवर्गातील सरळसेवा पदभरतीकरीता प्रसारित करण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालय / मा.उच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशांनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून १६ पैकी ०७ उमेदवारांची शिफारसपत्रे प्राप्त झाली असून तदनुषंगाने शिफारसप्राप्त उमेदवारांची 'सहाय्यक आयुक्त' पदावर नेमणूक करणेबाबतची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

प्रशासकीय निकडीनुसार शिफारसप्राप्त उमेदवार प्राप्त होईपर्यंत कार्यकारी अभियंता पेक्षा कमी नाही अशा दर्जाचा अधिकाऱ्यांकडे तात्पुरती कार्यव्यवस्था करण्यात आली आहे.

---

## सायन-प्रतिक्षा नगर येथील रहिवांशाचे एसआरए योजनेंतर्गत पुनर्वसन करण्याबाबत

**(१९) २३९६८ (२२-०७-२०२४) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सायन-प्रतिक्षा नगर (मुंबई) येथील तानसा पाईप लाईन शेजारील सावित्री फुले वसाहतीतील २६ कुटुंबे तसेच पंचशील नगर येथील २८५ रहिवाशांचे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतर्गत पुनर्वसन करण्याची जबाबदारी नवीन विकासकाने दर्शवली असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सावित्री फुले वसाहतीतील २६ कुटुंबे तसेच पंचशील नगर येथील २८५ रहिवाशांचे पुनर्वसन करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०५-०५-२०२६) :** (१) होय
(२) सायन प्रतिक्षा नगर, सॉल्ट पॅन विभाग, मुंबई येथील म्हाडा व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एकूण ३७००० चौ. मी. जमिनीवरील गणनाकृत झोपडपट्टी वसाहतीमधील पंचशील सह.गृह.संस्था (नियो.) या

गृहनिर्माण संस्थेचा पुनर्विकास करण्याकरीता विकासक व वास्तुविशारद यांची नियुक्ती करण्यात आलेली असून सदरची झोपु योजना सन २००८ मध्ये स्विकृत करण्यात आलेली आहे. सदर योजनेमध्ये १८३५ झोपडीधारकांचा समावेश आहे. सदर झोपु योजनेबाबत विकासक व वास्तुविशारद यांच्यामार्फत कोणताही पत्रव्यवहार झालेल्या नसल्यामुळे पुढील काहीही कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे प्राधिकरणामार्फत महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम १३ (२) अंतर्गत कार्यवाही करुन त्यांची नियुक्ती रद्द करण्यात आलेली आहे. तद्नंतर संबंधित झो.पु. योजनेत नविन विकासकाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई यांच्याकडे सन २०२४ मध्ये परिपत्रक क्र. १४४ अन्वये अर्ज दाखल केलेला होता.परंतु सदर अर्जासोबत त्यांनी आवश्यक त्या विविध विभागाच्या ना-हरकत प्रमाणपत्राच्या प्रती जोडलेल्या नसल्याबाबत प्राधिकरणाने दिनांक २९/०५/२०२४ रोजी अवगत केले होते. मात्र, विकासकाने अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही न केल्याने विकासक नेमणुकीबाबत प्राधिकरणामार्फत कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने जुन्या सात मजली पुनर्वसित इमारतीना अतिरिक्त लोखंडी जिने बसविण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत

**(२०) २४०१८ (२२-०७-२०२४) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील इमारतींना आग लागल्यानंतर जीवितहानी टाळण्याकरीता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने जुन्या सात मजली ५३२ पुनर्वसित इमारतीना अतिरिक्त लोखंडी जिने बसविण्याचा निर्णय घेतला असून त्यानुसार झोपु प्राधिकरणाने १३५ कोटी रुपयांचा प्रस्ताव माहे मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास राज्य शासनाकडे मंजूरीसाठी सादर केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे स्वरूप काय आहे, सदरहू प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली आहे काय,
(३) असल्यास,झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने शासनाला सादर केलेला प्रस्तावास विनाविलंब मंजूरी देवून कामाला सुरुवात होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०५-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) मुंबईमधील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांतर्गत येत असलेल्या एकूण ५६२ पुनर्वसित इमारतींना लोखंडी जिने (Spiral ladder/Dogg Legged) बसविण्याचा खर्च अंदाजित रुपये १३५ कोटी इतका अपेक्षित असून सदरचा निधी हा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडील उपलब्ध रक्कमेमधून करण्यास प्राधिकरणाने मंजूरी दिलेली आहे. सदर निविदा काढताना MACH व CREDAI मधील तज्ञांच्या सल्ल्यानूसार जुन्या इमारतीस जागेअभावी लोखंडी जिना बसविणे शक्य होणार नाही. त्यामुळे अशा इमारतीस तुषार यंत्रणा (Sprinkler System) पध्दत अथवा इतर काही पर्यायाबाबत विचार करुन निर्णय घेण्याच्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया राबविणे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.